विद्याविकास

स्वरंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०२३–२४/०४२ दिनांक : १४/०८/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,

विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत मतदार यादीमध्ये विद्यार्थ्यांची नावनोंदणी करणेबाबत**

**संदर्भ : संकीर्ण २०२३/प्र. क्र. ९७/वि शि ५ दिनांक १० जुलै, २०२३ चे प्रत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक–४१४ यांच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नावनोंदणी करण्याचा उपक्रम राबविण्यात यावा.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासन निर्देशानुसार वरील उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमाक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र. ९७/ वि शि ५ दिनांक -१०/७/२०२३

प्रति,

सर्व कुलसचिव,

**अकृषी विदयापीठे / अभिमत विदयापीठे / स्वयं अर्थसहायीत विदयापीठे**, महाराष्ट्र राज्य.

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

संचालक, कला संचालनालय, मुंबई.

विषय - विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करणेबाबत

**संदर्भ** - अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी , सा.प्र.विभाग, मंत्रालय यांचे क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र. ३८९/२३/३३, दिनांक ३०/६/२०२३ चे पत्र

महोदय,

विषयांकित संदर्भाधीन पत्रामध्ये विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत राज्यातील सर्व विद्यापीठे व त्या संलग्न महाविद्यालये / अभियांत्रिकी महाविदयालये / तंत्र निकेतन / अभिमत विद्यापीठे / खाजगी विद्यापीठे येथील विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचा उपक्रम राबविण्याबाबत संबंधितांना कळविण्याबाबत निदेशित करण्यात आले आहे. सदरहू पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सोबत- वरीलप्रमाणे

(शरद कोकाटे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत - कक्ष अधिकारी (कार्यासन ३३) ,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई